mauritiusexaminationssyndicatemauritiusexaminationssyndicatemauritiusexaminationssyndicatemauritiusexaminationssyndicatemauritius

Let the mind manage the body
Que l'esprit gère le corps

**MARATHI**
**(Subject code No. P190)**

**Index Number:** ..........................................................................................................

# MAURITIUS EXAMINATIONS SYNDICATE

## Primary School Achievement Certificate Assessment

**March 2021**

**Time: 1 hour 45 minutes**

**INSTRUCTIONS TO CANDIDATES**

1. Check that this assessment booklet contains **9** questions printed on **17** pages.
2. Write your Index Number on the assessment booklet in the space provided above.
3. You should not use red, green or black ink in answering questions.
4. Write all your answers clearly in the assessment booklet.
5. Attempt **all** questions.

| Question | Marking | | | Revision | | | Control | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | Sig | Marks | | Sig | Marks | | Sig |
| 1A | | | | | | | | | |
| 1B | | | | | | | | | |
| 2A | | | | | | | | | |
| 2B | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4A | | | | | | | | | |
| 4B | | | | | | | | | |
| 5A | | | | | | | | | |
| 5B | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | |
| 7A | | | | | | | | | |
| 7B | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | |
| **Sig (HoG)** | | | | | | | | | |

© Mauritius Examinations Syndicate

Marks

**Question 1A (5 marks)**
**चित्र ओळखा आणि नाव लिहा. एक उदाहरण दिलेले आहे.**



पुस्तक













Please turn over this page

## Question 1B (5 marks)

**योग्य वाक्य आणि चित्र जुळवा. एक उदाहरण दिलेले आहे.**



वंदना आणि संजू बसमध्ये आहेत.



सरिता झाडावर चढून फळे तोडते.



मनेश आपली खोली साफ करीत आहे.



आई गाडीने कामाला जाते.



बाजारात अनेक माणसे आहेत.



माझे मामा मासे पकडत आहेत.

**Question 2A (10 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा. एक उदाहरण दिलेले आहे.**

**उदाहरण:** हे _________ जुने दप्तर आहे.

अ. माझा ब. माझे

क. मला ड. माझी

१. पुढच्या आठवड्यात आम्ही माझ्या आईचा वाढदिवस साजरा _________.

अ. केली होती ब. केले

क. करते ड. करू

२. पुस्तकाचे दुकान _________ आहे? मला पुस्तक विकत घ्यायचे आहे.

अ. कोठे ब. कोण

क. कसा ड. केव्हा

३. माझे मित्र आणि मी आनंदात आहोत. _________ सहलीला जात आहोत.

अ. तो ब. तू

क. आम्ही ड. ते

४. माझा पाय दुखत आहे _________ मी पडले होते.

अ. कारण ब. जर

क. पण ड. किंवा

५. _________ गरम दूध आहे.

अ. कपवर ब. कपाला

क. कपात ड. कपातून

६. आजीने बाजारातून __________ भेंडी आणली.

अ. ताजा　　　　　ब. ताज्या

क. ताजी　　　　　ड. ताजे

७. रोज सकाळी बाबा वर्तमानपत्र __________ .

अ. वाचतात　　　　　ब. वाचते

क. वाचता　　　　　ड. वाचतोस

८. काल दुपारी __________ सर्व मिठाई खाल्ली.

अ. दादाला　　　　　ब. दादा

क. दादाने　　　　　ड. दादाचा

९. __________ आवडता रंग पांढरा आहे.

अ. तिच्या　　　　　ब. तिची

क. तिचे　　　　　ड. तिचा

१०. सकाळ__________ मोठा पाऊस पडत आहे.

अ. हून　　　　　ब. पासून

क. तून　　　　　ड. वरून

**Question 2B (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. बाबांचे बूट खूप _________ आहेत. त्यांनी ते साफ केले पाहिजे.

अ. नवी　　ब. लहान

क. अस्वच्छ　　ड. लवकर

२. ही खुर्ची तुटली आहे. आम्ही ती _________ दिली पाहिजे.

अ. पोलिसाकडे　　ब. सुताराकडे

क. शिंप्याकडे　　ड. डॉक्टरकडे

३. माझी मावशी आजारी आहे. उद्या आम्ही तिला _________ जाऊ.

अ. द्यायला　　ब. वाचायला

क. पाहायला　　ड. चालायला

४. मी एक नवा _________ विकत घेतला. लग्नाच्या दिवशी मी तो घालेन.

अ. मेज　　ब. पिशवी

क. सदरा　　ड. बाहुली

५. अनिलला आपले पेन _________ नाही. त्याला एक नवे पेन पाहिजे.

अ. सापडत　　ब. तोडत

क. विकत　　ड. थांबत

**Question 3 (10 marks)**
**खालील पोस्टर वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**छत्रपती शिवाजी सरकारी शाळा**
**निबंधलेखन स्पर्धा**

स्वातंत्र्यदिनानिमित्त छत्रपती शिवाजी सरकारी शाळा निबंधलेखन स्पर्धा आयोजित करीत आहे.

ही स्पर्धा सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.

**पुढील एका विषयावर तुम्ही लिहू शकताः**

- ❖ माझा आवडता शिक्षक
- ❖ माझ्या शाळेचा पहिला दिवस

**स्पर्धा पुढीलप्रमाणे होईलः**

तारीख : शुक्रवारी १२ फेब्रुवारी २०२१
वेळ : ११ ते १२ वाजता
स्थळ : शाळेचे पुस्तकालय

**बक्षीसः**
**पहिले बक्षीस :** हॉटेलात आपल्या कुटुंबाबरोबर दोन दिवस राहणे
**दुसरे बक्षीस :** आपल्या कुटुंबाबरोबर काजेलामध्ये एक दिवस

जर तुम्हाला स्पर्धेत भाग घेण्याची इच्छा असेल तर तुमच्या वर्गशिक्षकाला तुमचे नाव द्या.

तुमचे नाव देण्यासाठी शेवटची तारीख ३ फेब्रुवारी २०२१ आहे.

अधिक माहिती मिळवण्यासाठी मुख्यगुरुजी, श्री पांडू यांना ४२४८३२१ या नंबरवर फोन करा.

Marks

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कोणत्या शाळेने स्पर्धा आयोजित केली आहे?

______________________________________________ [1]

२. कोणती स्पर्धा आयोजित केली आहे?

______________________________________________ [1]

३. कोणत्या दिनानिमित्त स्पर्धा आयोजित केली आहे?

______________________________________________ [1]

४. कोणत्या वर्गातील मुलांना या स्पर्धेत भाग घेता येईल?

______________________________________________ [1]

५. ज्यावर मुलांना निबंध लिहिता येईल असा एक विषय द्या.

______________________________________________ [1]

६. कोणत्या तारखेला स्पर्धा होईल?

______________________________________________ [1]

७. किती वाजता स्पर्धा सुरू होईल?

______________________________________________ [1]

८. पहिले बक्षीस म्हणून काय मिळेल?

______________________________________________ [1]

९. स्पर्धेत भाग घेण्यासाठी तुम्ही काय केले पाहिजे?

______________________________________________ [1]

१०. श्री पांडू कोण आहेत?

______________________________________________ [1]



Please turn over this page

**Question 4 (15 marks)**

**खालील उतारा वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

विनय बारा वर्षांचा मुलगा होता. तो त्याच्या आईवडिलांबरोबर व त्याच्या आजीबरोबर राहत होता.  दररोज तो सायकलीने शाळेला जात असे.

एके दिवशी, त्याच्या आजीला बाजारात जायचे होते. ती निघून गेल्यावर विनयला दिसले की आजी मेजावर तिची पिशवी विसरली होती. “मी माझी सायकल घेऊन तिच्यामागे जाईन. ती बसमध्ये शिरण्यापूर्वी मी तिला भेटू शकतो.” त्याने असा विचार केला.

तो आपली सायकल घेऊन बसस्टॉपच्या दिशेने गेला. आजी रस्त्यावर चालत होती हे त्याने पाहिले. त्याचवेळी एका मोटरसायकलीवर दोन पुरूष आले. जेव्हा ते विनयच्या आजीजवळ गेले तेव्हा त्यांच्यापैकी एक पुरूष मोटरसायकलीवरून खाली उतरला. झटकन त्याने आजीची सोन्याची साखळी ओढली. बिचारी आजी खाली पडली आणि ती रडायला लागली.

हे सगळे पाहिल्यावर विनयला राग आला. घाईघाईने तो आजीला उठण्यासाठी मदत करायला गेला. “काळजी करू नकोस आजी. मी तुझ्यासाठी हे चोर पकडेन.” तो म्हणाला.

त्याने आपली सायकल पुन्हा घेतली आणि तो वेगाने सायकल चालवू लागला. काही वेळानंतर त्याला ते दोन चोर दिसले. ते एका मोठ्या घरात जात होते. विनय शांतपणे त्यांच्या मागोमाग गेला. त्याने खिडकीमधून पाहिले की चोरांनी एका फुलदाणीत सोन्याची साखळी ठेवली होती.

वेळ न लावता, तो जवळच्या पोलीस ठाण्यात गेला. त्याने पोलिसांना सर्व काही सांगितले.  पोलीस विनयबरोबर चोरांच्या घरात गेले. त्यांनी दार ठोठावले व एका चोराने दार उघडले.

“तुम्ही एक सोन्याची साखळी चोरी केली आहे का?” एका पोलिसाने मोठ्या आवाजात विचारले.

“मुळीच नाही. तुम्ही सगळीकडे शोधू शकता. तुम्हाला काहीच मिळणार नाही.”

“ते खोटे बोलत आहेत.” विनय ओरडला. “साखळी त्या फुलदाणीत आहे.”

हे ऐकल्यावर, चोर पळून जाण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु पोलिसांनी त्यांना लगेच पकडले.

विनय घरी गेला आणि त्याने आजीला साखळी दिली. विनयने चोरांना पकडण्यासाठी कशी मदत केली हे ऐकल्यावर आजीला अभिमान वाटला.

**Question 4A (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. विनय रोज ____________ शाळेला जात होता.

अ. बसने

ब. गाडीने

क. मोटरसायकलीने

ड. सायकलीने

२. विनयची आजी तिची ____________ विसरली होती.

अ. साखळी

ब. पिशवी

क. फुलदाणी

ड. चष्मा

३. जेव्हा विनयने पाहिले की आजीला काय झाले होते तेव्हा त्याने **सर्व प्रथम** काय केले ?

अ. तो चोरांच्या मागोमाग गेला.

ब. त्याने पोलिसाला बोलावले.

क. तो घरी गेला.

ड. त्याने आजीला उठण्यासाठी मदत केली.

४. चोरांनी ___________ साखळी ठेवली होती.

अ. पिशवीत

ब. फुलदाणीत

क. मोटरसायकलीत

ड. खिडकीमागे

५. या उताऱ्यात, विनय कशा प्रकारचा मुलगा आहे?

अ. आळशी

ब. लोभी

क. मूर्ख

ड. बलवान

**Question 4B (10 marks)**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. चोरांनी विनयच्या आजीची साखळी कशी चोरी केली?

(i)______________________________________________________ [1]

(ii)______________________________________________________[1]

Marks

२. विनय चोरांच्या मागोमाग ‘शांतपणे’ का गेला?

______________________________________________________

______________________________________________________ [1]

३. पोलिसांनी विनयला कशी मदत केली?

(i)______________________________________________________ [1]

(ii)______________________________________________________ [1]

४. शेवटी, विनयच्या आजीला कसे वाटले? का?

(i)______________________________________________________ [1]

(ii)______________________________________________________ [1]

५. पुढील वाक्ये उताऱ्यानुसार योग्य क्रमात लिहा. पहिले वाक्य देण्यात आले.

| | |
|---|---|
| ● साखळी कोठे होती हे विनयने पोलिसांना दाखवले. | |
| ● विनयला राग आला होता. | १ |
| ● विनयने आजीला साखळी परत दिली. | |
| ● विनयने खिडकीमधून चोरांच्या घरात पाहिले. | |

[3]

**Question 5A (4 marks)**

**वाक्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.**

**(अ) खालील शब्द योग्य क्रमाने लिहून वाक्ये लिहा.**

१. चार – आहेत – कुत्र्यांची – बसलेली – दारासमोर – पिल्ले

________________________________________

________________________________________

२. टीव्हीवर – पाहिला – चित्रपट – रात्री – आम्ही – काल

________________________________________

________________________________________

**Question 5B (6 marks)**

**(ब) खाली दिलेली अपूर्ण वाक्ये पूर्ण करा.**

१. प्रकाशला भूक लागते म्हणून ________________________

________________________________________

२. जेव्हा आम्ही समुद्रकाठी पोहोचलो तेव्हा ____________________

________________________________________

३. काल ताई कामाला गेली नव्हती कारण ____________________

________________________________________

**Question 6 (10 marks)**

**खालील गोष्ट वाचून मोकळया जागी योग्य शब्द भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **घरात** | **शाळेच्या** | **गोष्टी** | **तयार** | **माझ्या** |
| **एकत्र** | **सर्वात** | **राहत** | **लिहिते** | **आवडते** |

सर्व मुलांना आपली आजी आवडते. माझी आजी जगातील ________ चांगली आजी आहे. ती माझ्याबरोबर ________ नाही पण मला तिची आठवण येते. मी नेहमी तिच्यासाठी पत्रे ________ .

मला आनंद वाटतो की ती ________ जीवनात आहे कारण ती खूप चांगली आहे. ती समुद्रकाठी एका छोट्या ________ राहते. ________ सुट्टीत जेव्हा मी तिच्याकडे राहायला जाते तेव्हा ती माझ्याबरोबर खेळते. ती सदैव माझे आवडते जेवण ________ करते.

दर रात्री आम्ही ________ तिची जुनी छायाचित्रे पाहतो. ती मला तिच्याबद्दल मजेदार ________ सांगते. मला तिच्या गोष्टी ऐकण्यास खूप ________ . घरी परत जाण्याची वेळ आली की मला दुःख वाटते.

**Question 7A (5 marks)**

**खाली दिलेल्या वाक्यात काही चुकीचे शब्द अधोरेखित आहेत. कंसातील  मोकळ्या जागी त्या शब्दाचे योग्य रूप लिहा.**

१.प्रिया **आनि** अंजू नदीकाठी गेल्या . (________)

२. अक्षय एक नवे **नातक** पाहत आहे. (________)

३. **राजीवचा** कपडे मळके आहेत. (________)

४. शाळेच्या **आवारत** एक नळ आहे. (________)

५. पावसात **आम्हाला** पावसाळी कोट वापरतो. (________)

**Question 7B (5 marks)**

**कंसातील शब्दांचे योग्य रूप लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१. हिवाळ्यात आम्हाला (थंड) ________ वाजते.

२. मंगेशची मावशी (दया) ________ आहे.

३. ती माणसे खूप (श्रीमंती) ________ आहेत.

४. माझ्या आजीला हिरव्या (बांगडी) ________ आवडतात.

५. बाबा नेहमी (तेल) ________ पदार्थ खातात.

**Question 8 (10 marks)**

**खाली दिलेल्या प्रत्येक चित्रावर एक वाक्य लिहून <u>गोष्ट लिहा</u>. तुम्हाला दिलेल्या शब्दांचाच वापर करावा.**




एके दिवशी – दुकान

_______________________________________________

_______________________________________________




काही वेळानंतर – परतणे

_______________________________________________

_______________________________________________



दुर्दैवाने – खाली पडणे

_______________________________________________

_______________________________________________



त्या वेळी – मदत

_______________________________________________

_______________________________________________



शेवटी – आभार मानणे

_______________________________________________

_______________________________________________

**Question 9 (10 marks)**

**दिलेल्या मुद्यांच्या आधारे सुमारे १०० शब्दांचा एक निबंध लिहा.**

- समुद्रकाठी
- मुले पाण्यात खेळणे
- एक मूल मदतीसाठी ओरडणे
- नंतर तुम्ही काय करता?
- शेवटी काय होते?

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

..............................................................................................................................................

Marks



Please turn over this page

**BLANK PAGE**